सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
(०२०) २५६२ ११८८
२५६२ ११८९

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
इ—मेल : affiliation@pun.unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीए/१७१५

दिनांक : २३/०९/२०२२

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व संबंधित महाविद्यालये/
सर्व संबंधित मान्यता प्राप्त परिसंस्था/संशोधन संस्था/केंद्र

विषय : १. शैक्षणिक वर्ष २०२३—२०२४ व २०२४— २०२५ करीता संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्था/संशोधन संस्था/केंद्रामधील मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांचे नूतनीकरण, स्थायी संलग्नीकरण/मान्यता व नैसर्गिकवाढ तसेच शैक्षणिक वर्ष २०२३—२०२४ करीता नवीन संशोधन केंद्र, संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्थेतील नवीन संशोधन केंद्र, संशोधन केंद्रामध्ये नवीन विषय/अभ्यासक्रमांना मान्यतेकरीता प्रस्ताव सादर करण्याबाबत

२. शैक्षणिक वर्ष २०२३ — २०२४ साठी अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये/परिसंस्थामध्ये नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी, प्रवेशक्षमता वाढ, विशेषस्तर विषय मान्यतेकरिता प्रस्ताव सादर करण्याबाबत

संदर्भ : प्रस्तुत विद्यापीठाचे पत्र संदर्भ क्र. सीए/१४७४, दिनांक ३०/०८/२०२२

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबत प्राप्त आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९, ११०, १११, ११४ व ११६ मधील तरतुदीनुसार संलग्नित महाविद्यालये/परिसंस्था/संशोधनसंस्था/केंद्र यामधील अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२३—२०२४ व २०२४—२०२५ करीता संलग्नीकरणाच्या/मान्यतेच्या नूतनीकरण, स्थायी संलग्नीकरण/मान्यता, नैसर्गिकवाढ तसेच शैक्षणिक वर्ष २०२३—२०२४ करीता नवीन संशोधन केंद्र/ संलग्नित महाविद्यालये/मान्यता प्राप्त परिसंस्थेतील नवीन संशोधन केंद्र/अस्तित्वात असलेल्या

संशोधन केंद्रामध्ये नवीन विषय/अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचे प्रस्ताव तसेच **शैक्षणिक वर्ष २०२३—२०२४ साठी अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये/परिसंस्थामध्ये नवीन पाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, तुकडी, प्रवेशक्षमता वाढ, विशेषस्तर विषय मान्यतेकरिता प्रस्ताव सादर करण्याबाबत** विद्यापीठाच्या www.unipune.ac.in या संकेत स्थळावरील BOD - BOD Online – Colleges/Institutes – Affiliation या लिंकवरून काळजीपूर्वक भरून सक्षम अधिकाऱ्याच्या स्वाक्षरी व शिक्क्यानिशी तसेच विहित शुल्कासह व आवश्यक त्या कागदपत्रांसह **दि. ३० सप्टेंबर, २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत** या विभागाकडे जमा करावेत.

(टिप : व्यावसायिक अभ्यासक्रमांकरीता शैक्षणिक वर्ष २०२३—२०२४ करीता प्रस्ताव सादर करावेत.)

आपला,

23/9/2022

(स. द. डावखर)
उपकुलसचिव